


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ

Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे   अंक : ३८ वा सोमवार   दि. १० मार्च २०२५   पृष्ठ ८   किंमत ३ रुपये

# महाभ्रष्टाचारी टेकाळेंवर कारवाईसाठी महसूल विभाग पुन्हा ॲक्शन मोडवर...

## विद्यमान तहसीलदारांकडून उचित कार्यवाही होण्याची अपेक्षा

**जनसंचलन/बुलढाणा**

येथील महसुल विभागाच्या इतिहासातील सर्वात महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन केल्यासंदर्भात ज्या काही तक्रारी झाल्या होत्या, त्याबाबत आजवर खरे तर महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून कारवाई अपेक्षित होती, परंतु महसूल विभागाने आपला ढिसाळपणा वारंवार सिद्ध केल्याने कोणतीही कारवाई टेकाळेंवर झाली नाही. त्यामुळे यासंदर्भात उपविभागीय अधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा एक पत्र बुलढाणा तहसीलदारांकडे पाठवून टेकाळेंनी तुकडेबंदी कायद्यासंदर्भात जे काही उल्लंघन केले आहे, त्यासंबंधीचा अहवाल पाठवण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. यापूर्वीचे तहसीलदार रुपेश खंडारे या विषयाबाबत खूपच ढिसाळपणा केला होता, परंतु विद्यमान तहसीलदार याबाबत योग्य कारवाई करतील, ही अपेक्षा आहे. मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांनी आपल्या सेवाकाळात अत्यंत बेशरमपणे, बेबंदपणे भ्रष्टाचार केलेला आहे. त्यांनी भ्रष्टाचाराच्या सर्व सीमा अत्यंत निर्लज्जपणे पार केल्या आहेत. या भ्रष्टाचारातून त्यांनी प्रचंड अशी मायादेखील स्वतःच्या व नातेवाईकांच्या नावावर जमवली आहे. एव्हढे सगळी पापं करून देखील टेकाळे आजही उजळ माथ्याने महसूल विभागात वावरताना दिसत आहेत. त्यांच्यावर कारवाई करण्याची हिम्मत कोण्याही अधिकाऱ्यात आजवर दिसून आलेली नाही. त्यामुळे टेकाळे हे अत्यंत उन्मत्तपणे वागत आजही भ्रष्टाचार करीत आहेत. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने या प्रकरणाचा पाठपुरावा केल्यानंतर महसूल प्रशासनाने यासंदर्भात थातूरमातूर कारवाईला सुरवात केली होती, परंतु ती कारवाई देखील खूपच जुजबी स्वरूपाची ठरली.सिटी न्यूज व दैनिक जनसंचलनच्या वतीने टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचे अत्यंत सज्जड असे पुरावे हे तहसीलदार, उपविभागीय अधिकारी, जिल्हाधिकारी तसेच महसूल आयुक्त अमरावती यांच्यापर्यंत पोहोचवलेले आहेत. काही महिन्यांपूर्वी उपविभागीय अधिकाऱ्यांनी यासंदर्भात एक पत्र देऊन टेकाळेंच्या भ्रष्टाचारासंदर्भात अहवाल पाठवण्याचे निर्देश दिले होते. परंतु तत्कालीन तहसीलदार रूपेश खंडारे यांनी यात प्रचंड चालढकल करून एक प्रकारे टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचा संरक्षण देण्याचे काम केले होते. आता परत यासंदर्भात उपविभागीय अधिकारी बुलढाणा यांनी तहसीलदारांना टेकाळेंनी चांडोळ भाग-१ येथे कार्यरत असताना तुकडेबंदी कायद्याचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर अनोंदणीकृत वाटपाचे एकूण ५० फेरफार मंजूर केल्याबद्दल चौकशी करून स्वयंस्पष्ट अभिप्रायासह अहवाल सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत. एव्हढेच नाही तर उपविभागीय अधिकाऱ्यांनी या पत्रासोबत सर्व फेरफाराची कागदपत्रेही पाठवली आहेत. या प्रकरणी खरे तर टेकाळे यांच्यावर महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ च्या नियम ३ (१), (२), (३) नुसार कठोर कारवाई होणे अपेक्षित आहे. टेकाळेंच्या भ्रष्टाचाराची सर्व कागदपत्रे खरे तर दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजने अधिकाऱ्यांना उपलब्ध करून दिलेली आहेत, तरीही महसूल प्रशासनात बसलेले काही अधिकारी हे महाभ्रष्टाचारी टेकाळेंना वाचवण्यासाठी वाट्टेल त्या थराला जाण्याचा नालायकपणा करीत आहेत. त्यामुळेच टेकाळेंवर कोणतीही कारवाई होताना दिसून येत नाही.दैनिक जनसंचलनच्या रेट्यामुळे आता हा मुद्दा



पाठपुरावा
**सिटी न्युज & दैनिक जनसंचलन**

**टेकाळेंवर कारवाई करण्यात पोलिस विभागाचीही चालढकल? आर्थिक गुन्हे शाखेकडे तक्रारींनंतरही कारवाई गुलदस्त्यात**

पुन्हा ऐरणीवर आलेला असताना विद्यमान तहसीलदारांनी या गंभीर विषयासंदर्भात तत्परता दाखवावी व प्रकरणातील सत्यता, गंभीरता लक्षात घेता योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षा आहे. आजवर टेकाळेंसंदर्भात केवळ कागदी घोडे नाचवण्याचा प्रताप महसूल विभागाने केला आहे. परंतु त्याने महसूल विभागातील टेकाळेंसारखी भ्रष्टाचाराची कीड कधीही संपणार नाही. जोपर्यंत टेकाळेंवर योग्य कायदेशीर कारवाई होत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज या प्रकरणाचा पाठपुरावा करीतच राहणार आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

# समाज कल्याण येथील सामाजिक सभागृहामध्ये जागतिक महिला दिन साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

आज जगभरात जागतिक महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. महिलांच्या सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि राजकीय योगदानाचा सन्मान करण्याचा हा दिवस आहे.अनेक सामाजिक संस्था महिलांच्या हक्कांसाठी आणि समानतेसाठी विविध उपक्रम राबवत आहेत. यामध्ये जनजागृतीपर व्याख्याने, कार्यशाळा आणि रॅलींचा समावेश आहे.

बुलढाणा येथील सामाजिक न्याय भवन येथे मोठ्या उत्साहात जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला आहे. सकाळी ११ वाजेपासून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हा परिषद सिओ गुलाबराव खरात व मुख्य लेखा वित्त अधिकारी प्रकाश राठोड यांच्या हस्ते करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता मा जिजाऊ मासाहेब सावित्रीबाई फुले इंदिरा गांधी व माँ फातिमा यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली आहे.

या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून शीलाताई किरण पाटील, योगिताताई इंगळे, एडवोकेट शर्वरीताई तुपकर, अनुजा ताई सावळे, मृणाल ताई सपकाळ, निशाताई जेल यांची उपस्थिती होती. समाज कल्याण अधिकारी अनिताताई राठोड तसेच जिल्हा परिषद सी ओ गुलाबराव खरात यांचे मार्गदर्शन लाभले आहे. या ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम समूह नृत्य एकल नृत्य समूह गीत एकल गीत कविता गायन अंताक्षरी व प्रश्न उत्तरांचा खेळ असे विविध स्पर्धा या ठिकाणी घेण्यात आल्या आहे.

या कार्यक्रमाची महत्त्वाची भूमिका पुष्पा ताई गायकवाड, अंजली ताई नेटके, जेमला ताई राठोड, वैशालीताई उबरांडे, राधाताई उबरांडे, उज्वला ताई जुपे, अरुणाताई पांचाळ, पोर्णिमा ताई रोठे, राधाताई गोसावी यांनी बजावली आहे.

# मुंबई पाहा जरा पूर्वेकडे...

## संपादकीय लेख

लंडनच्या धर्तीवर मुंबईचेही विहंगदृश्य घडविणारा एक उंच पाळणा, मोकळी मैदाने, समुद्रावर फेरफटका मारणाऱ्या नौकांच्या सफरीसाठी सुसज्ज मरिना आणि किफायतशीर घरेही... मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवर अशी तिसरी, चौथी किंवा पाचवी मुंबई उभी करण्याचे स्वप्न गेली पंचवीस वर्षे दाखविले जात आहे. दर काही महिन्यांनी ङ्गईस्टर्न वॉटरफ्रंटफ या गोंडस नावाने त्याविषयीच्या घोषणांची उबळ राज्यकर्त्यांना येते आणि तितक्याच जलदगतीने ती विरतेही. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवरील एक सुरक्षित बंदर असलेल्या मुंबईला पूर्व किनारपट्टी आहे आणि त्यातच तिची भौगोलिक सुरक्षितताही दडलेली आहे. कुलाबा, गेट वे ऑफ इंडियापासून ते शिवडीपर्यंतचा हा परिसर बंदरामुळे नावारूपास आला. तिथल्या गोद्या, जहाजबांधणी उद्योग, बंदरावरून होणारी मालवाहतूक, त्यासाठी असलेला लोहमार्ग, गोदामे असा हा सुमारे १८०० एकर क्षेत्रफळाचा परिसर आहे. मात्र या परिसराला मुंबईच्या मुख्य प्रवाहात आणून सोयीसुविधांची तफावत दूर करण्याचे उद्दिष्ट काही मुंबईकरांना साध्य करता आलेले नाही. कुलाब्याच्या रेडिओ क्लबजवळ नौकानयन व प्रवासी बोटींसाठी पावणेदोनशे कोटी रुपये खर्चाचा मरिना प्रकल्प गेली कित्येक वर्षे चर्चेत आहे. आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या १०० दिवसांच्या महत्त्वाकांक्षी योजनांमध्ये पुन्हा एकदा त्याचा उल्लेख आला आहे. सुमारे १४ वर्षांपूर्वी तत्कालीन मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या काळात मरिना प्रकल्पाची घोषणा झाली होती. आता हा प्रकल्प जोर धरेल, असे वाटत असतानाच कुलाब्यातील नागरी संघटनांनी वाहतूककोंडीचे कारण पुढे करत हा प्रकल्प इथे करण्यास विरोध दर्शविला आहे. रेडिओ क्लबऐवजी प्रिन्सेस डॉककडे हा प्रकल्प नेण्याची सूचना त्यांनी केली आहे. म्हणजे सन २०२५ची डेडलाइन हा प्रकल्प कसा गाठणार, याबद्दल साशंकता कायम आहे. तसे तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनीही मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवर आकर्षक योजना राबविण्याच्या घोषणा केल्या, त्यालाही आता बराच काळ लोटला आहे. दीपगृह सर्वांना दिसते आहे, परंतु किनारा काही सापडत नाही, अशी या योजनांची स्थिती आहे. मुंबईच्या पूर्व किनारपट्टीवरील भूखंडांचा सर्वांत मोठा व धनाढ्य मालक म्हणजे मुंबई पोर्ट ट्रस्ट. गेल्या तीन दशकांमध्ये मुंबई पोर्ट ट्रस्टच्या बंदरांतील व्यापारी वाहतुकीला विविध व्यावसायिक कारणांमुळे ओहोटी लागली. न्हावाशेवा येथे अधिक खोल पाण्यातील जवाहरलाल नेहरू पोर्ट आकारास आले, तेव्हापासून तर येथील बंदरविषयक कारभार रोडावत गेला. त्यानंतर नव्वदीच्या दशकाच्या अखेरीसच या संपूर्ण परिसराचे पुनरुज्जीवन करण्याच्या योजनेवर चर्चा सुरू झाली. वास्तुरचनाकार पंकज जोशी यांनी ङ्गमुंबई बंदराचे नागरी पुनरुत्थानफ या विषयावर सन १९९८मध्ये यॉर्क विद्यापीठास एम.ए.साठीचा शोधनिबंध सादर केला होता. एके काळी कार्यरत असलेल्या गोद्यांचा कारभार थंडावल्यानंतर त्यांच्या सुयोग्य वापराबाबत हेळसांड केल्यामुळे अतिक्रमणे, बेकायदा धंदे यांचा शिरकाव तिथे झाला, याकडे त्यांनी लक्ष वेधले होते. त्या काळी तिथे सुमारे सव्वा लाख अतिक्रमित होते. ब्रिटनचा कटू अनुभव पाहता, या परिसराचे पुनरुत्थान करताना ते केवळ व्यापारी वाऱ्यांवर सोडू नये. कारण तसे केल्यास सामाजिक कल्याण, किफायतशीर निवारे आणि तफावत असलेल्या अन्य सुविधांची या परिसरात उभारणी करण्याची संधी आपण गमावतो, हा अत्यंत महत्त्वाचा मुद्दा त्यांनी अधोरेखित केला होता. या परिसरात पाच लाख लोकांसाठी घरे आणि गोदीतील बेरोजगारांसाठी ६० हजार नवे रोजगार तयार होऊ शकतात, अशी योजना त्यात होती. गिरण्यांच्या जमिनींचा व्यापारी वापर करतानाही मुंबईने संधी गमावली होतीच. गोदी परिसरात पूर्णतः नव्याने आखीवरेखीव शहर वसविण्याची संधी आपण गेल्या पाव शतकांत तरी गमावली. एकूणच पूर्वेकडे पाहण्याचा सरकारी दृष्टिकोन संकुचितच असावा, असे दिसते. सर्व काही दक्षिण मुंबई किंवा पश्चिमकेंद्री करायचे आणि डम्पिंग ग्राउंडपासून सगळे पूर्वेकडेच लोटायचे. याला काही समतोल विकास म्हणता येत नाही. विकासकांची दृष्टी पडल्यावरच विकास होतो, असे नव्हे. शंभर वर्षांच्या गरजा पाहून शहरे वसवायची, तर त्यातले पाव शतक असे नियोजनशून्यतेतच वाया जाते. याचे उत्तरदायित्व कुणाचे?

# राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालय, बुलडाणा येथे राष्ट्रीय टेक्निकल इव्हेंट टेक व्हिजन २०२५ चे आयोजन संपन्न.

**जनसंचलन/बुलढाणा**



द्वारका बहुउद्देशीय ग्रामीण विकास फाउंडेशन द्वारा संचालित, राजर्षी शाहू अभियांत्रिकी बुलडाणा येथे प्रत्येकवर्षी विद्यार्थ्यांच्या सुप्त प्रतिभेला चालना व सादरीकरण प्लॅटफॉर्म देण्याच्या उद्देशाने, द्वारका फाउंडेशनचे अध्यक्ष श्री धृपतरावजी सावळे साहेब व सचिव सौ.कीर्तिताई पऱ्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली इन्व्हेंट चे आयोजन करण्यात येते. या वर्षी सुद्धा ०४ मार्च २०२५ रोजी राष्ट्रीय स्थराचा टेकनिकल इव्हेंट - -२०२५ राजर्षी शाहू अभियांत्रिकी बुलडाणा येथे आयोजित करण्यात आले होते. या इव्हेंट मध्ये शालेय विद्यार्थ्यांसाठी विज्ञान प्रदर्शन तसेच अभियांत्रिकी व इतर शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी पोस्टर प्रेसेंटशन, कुविझ, रोबो रेस, ब्रिज मेकिंग, तसेच विद्यार्थ्यांच्या मनोरंजनासाठी बॉक्स क्रिकेट, स्लोव सायकलिंग, टग ऑफ वॉर, स्पॉट फोटोग्राफी इत्यादी ९ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमासाठी प्रमुख अथिति उदघाटक म्हणून पोदार इंटरनॅशनल स्कूल चे प्राचार्य श्री. अजय इंगळे तर कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रसिद्ध दंत चिकीत्सक डॉ. समीरजी प-हाड उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात ही दीपप्रजलन व प्रतिमेशपूजन करून करण्यात आली. या टेक्निकल इव्हेंट टेक व्हिजन २०२५ प्रास्ताविक व प्रमुख अतिथींचा परिचय कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. एम. एम. खान यांनी केले व आयोजनाचा उद्देश समजून सांगितला. या इव्हेंट मध्ये शहरातील प्राथमिक, माध्यमिक, कनिष्ठ महाविद्यालय, तसेच तंत्रनिकेतन व अभियांत्रिकी महाविद्यालयातील साडेचारशेपेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे उदघाटक प्राचार्य श्री. अजय इंगळे यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्दर्शन केले. त्यांनी आपल्या भाषणात टेकनॉलॉजी मुळे झालेल्या आमूलाग्र प्रगतीने मानवी जीवन किती सुखकर केले हे उदाहरणाच्या दाखल्यांसह संजूवन व पटवून दिले. तसेच नवीन तंत्रज्ञानामुळे होणारे फायदे आणि नुकसान यावर विविध उदाहरणे देऊन प्रकाश टाकला. नवीन तंत्रज्ञान विकसित करणे तसेच ते योग्यरीत्या वापरने हि काळाची गरज आहे आणि ह्यासाठी राजर्षी शाहू कॉलेज ऑफ इंजिनीरिंग सतत कार्यरत असते, त्यासाठी त्यांनी महाविद्यालयाचे कौतुकही केले. तसेच अध्यक्षीय भाषणात डॉ. समीरजी पऱ्हाड यांनी मार्गदर्शनातून विद्यार्थ्यांनी जीवनामध्ये चौकस विज्ञाननिस्ट दृष्टीकोन किती महत्वाचा आहे हे विविध उदाहरणांच्या माध्यमातून समजून सांगितले. तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे आपले जीवन सोपे, अधिक आरामदायी आणि अधिक आनंददायी झाले आहे. हे कार्य पूर्ण करण्यासाठी लागणारा प्रयत्न आणि वेळ कमी करते, त्यामुळे कामाची गुणवत्ता आणि कार्यक्षमता वाढते असे सांगितले. त्यामध्ये त्यांनी तरुणांनाचे योगदान किती सर्वात महत्वाचे आहे हे सांगितले. तरुणांच्या शक्ती लायोग्य दिशा व एक्सपोजर देण्याची गरज आहे तशा प्रकारचा प्रयत्न आशा प्रकारच्या कार्यक्क्रमांच्या आयोजनाच्या माध्यमातून संपूर्ण स्थरावर होणे गरजेचे आहे. असे सांगितले. याप्रसंगी मंचावर सौ. कीर्तिताई पऱ्हाड, प्रा. बी. व्ही, नरवाडे, प्रा. पी. एस. राणे तसेच या कर्यक्रमचे समन्वयक प्रा.एम. एम. खान उपस्थित होते. इस्पर्धे संपल्यानंतर बक्षीस वितरण सोहळा चालू झाला या वेळी सौ. कीर्तिताई पऱ्हाड मॅम यांनी आपल्या भाषणात प्रमाण पत्र व बक्षीस चे विद्यार्थी जिवनात किती महत्व असते याचा उल्लेख केला.

# रिया वेलनेस अँड फिटनेस सेंटर अँड जिम, धर्मवीर आखाडा टिळकवाडी बुलढाणा च्या वतीने जागतिक महिला दिन साजरा...

**जनसंचलन/बुलढाणा**

८ मार्च २०२५ जागतिक महिला दिनानिमित्त धर्मवीर आ. संजयजी गायकवाड यांच्या संकल्पनेतून रिया वेलनेस अँड फिटनेस सेंटर अँड जिम, धर्मवीर आखाडा टिळकवाडी बुलढाणा च्या वतीने जागतिक महिला दिन साजरा करण्यात आला कार्यक्रमामध्ये सेंटरच्या अनेक महिलांनी सहभाग घेतला सेंटरच्या संचालिका रोहिणी देशमुख मॅडम यांनी मार्गदर्शन करताना अनेक महत्त्वाचे मुद्दे मांडले जसे की स्त्री कणखर असते म्हणूनच पुढची पिढी घडते घरातील काम करण्यापासून नोकरी आणि करिअर घडवण्याचं काम महिला करतात, म्हणूनच त्यांना मल्टीटास्कर्क असं म्हटलं जातं. महिलांवर त्यांची मुले व कुटुंबाची काळजी घेण्याची जबाबदारी असते, तसेच त्या त्यांची वैयक्तिक व व्यावसायिक ध्येये साध्य करण्यामध्ये संतुलन देखील राखतात. या अशा व्यस्त जीवनशैलीमुळे अनेक महिलांचे त्यांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होते. प्रत्येक व्यक्तीचे व्यायामाने शारीरिक आणि मानसिक आरोग्य सुधारते प्रत्येक महिलेने स्वतःसाठी एक तास फिटनेस का डोस एक घंटा रोज महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा आहे असे महत्वपूर्ण मार्गदर्शन जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने केले. कार्यक्रमांमध्ये विविध स्पर्धा डान्स,महिलांचे व्यायामाबद्दल अनुभव, फिटनेस सेंटर विषयी मते घेण्यात आली. या कार्यक्रमाचा समारोप आभार प्रदर्शन अॅड ज्योती चव्हाण यांनी केले..



The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# महिला सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य; जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमात पंतप्रधान मोदींची ग्वाही...

**गुजरात:** ङआमच्या सरकारने महिला सुरक्षेस सर्वोच्च प्राधान्य दिले असून, महिलाविरोधी गुन्ह्यांसाठी अतिशय कठोर कायदे व नियम आखले आहेत. बलात्कारासारख्या घृणास्पद गुन्ह्यातील गुन्हेगारांसाठी फाशीच्या शिक्षेची तरतूदही या कायद्यात आहेफ, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी येथे केले. जागतिक महिला दिनानिमित्त नवसारी जिल्ह्यातील वांसी बोरसी गावात आयोजित केलेल्या महिलांच्या महामेळाव्यास ते संबोधित करत होते. भारतीय दंड संहितेची जागा घेतलेल्या भारतीय न्याय संहितेत महिला सुरक्षेसंबंधी कायदे अधिक कठोर करण्यात आले आहेत. तसेच, महिलांवर झालेल्या अत्याचाराच्या तक्रारी दाखल करणे अधिक सोपे झाले आहे. बलात्काराच्या गुन्ह्यांत ६० दिवसांत गुन्हेनोंद करणे, ४५ दिवसांत निकाल देणे बंधनकारक करण्यात आले असून, यामुळे या प्रकरणांचा जलदगतीने निपटारा होणे शक्य झाले आहे,फ असे ते म्हणाले. आपल्या देशाची वेगाने प्रगती व्हावी यासाठी महिलांच्या नेतृत्वाखाली आपण मार्गक्रमण



करत आहोत, असेही त्यांनी नमूद केले. एखादी मुलगी घरी उशिरा परतते तेव्हा तिचे पालक तिला त्याबाबतचे कारण विचारतात. मात्र मुलगा उशिरा येतो तेव्हा असे घडत नाही. पालकांनी मुलांना हे विचारायला हवे. महिला सुरक्षेस आमच्या सरकारने सर्वोच्च प्राधान्य दिले आहे. आमच्या सरकारने यासंबंधीचे कायदे कठोर केले, तसेच त्यात आवश्यक बदलही केले. बलात्कारासारख्या घृणास्पद गुन्ह्यासाठी आमच्याच सरकारने फाशीच्या शिक्षेची तरतूद केली,फ याकडे त्यांनी लक्ष वेधले.महिलांवरील गुन्ह्यांच्या प्रकरणांचा झटपट निपटारा होण्यासाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांचीही त्यांनी माहिती दिली. ङपीडित महिलांना झटपट न्याय मिळावा यासाठी आम्ही आठशे जलदगती न्यायालयांना मंजुरी दिली असून, यातील बहुतांश न्यायालये कार्यान्वित झाली आहेत,फ असे पंतप्रधानांनी सांगितले. ङब्रिटीश वसाहतींच्या काळातील भारतीय दंड संहितेला आमच्या सरकारने मूठमाती दिली असून त्याची जागा भारतीय न्याय संहितेने घेतली आहे. महिला व बालकांवरील अत्याचाराच्या घटनांतील गुन्हेगारांना करण्यात येणाऱ्या शिक्षांसाठी या नव्या कायद्यात एक स्वतंत्र प्रकरण निर्माण केले गेले आहे,फ अशी माहिती त्यांनी दिली.आमचे सरकार महिलांच्या सन्मानास व सुविधांनाही सर्वोच्च महत्त्व देते. आमच्या सरकारने देशभरात बांधलेल्या हजारो शौचालयांमुळे महिलांची कुचंबणा थांबली आहे. आम्ही महिलांना प्रतिष्ठा मिळवून दिली. तिहेरी तलाकसारख्या कुप्रथांविरोधात कठोर कायदा करत आमच्या सरकारने लाखो मुस्लिम महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त होण्यापासून वाचवले,फ असेही पंतप्रधानांनी नमूद केले. ङदेशात दहा कोटींहून अधिक महिला ९० लाख स्वयंसहायता गट चालवत आहेत,फ असेही ते म्हणाले. जागतिक महिला दिनानिमित्त पंतप्रधान मोदी यांच्या ङएक्सफ या समाजमाध्यमाच्या खात्याचा ताबा शनिवारी विविध क्षेत्रांतील असामान्य महिलांकडे होता. बुद्धिबळ ग्रँडमास्टर आर. वैशाली, कृषी उत्पादक अनितादेवी, अणुशास्त्रज्ञ एलिना मिश्रा, अंतराळ संशोधक शिल्पी सोनी, अ‍ॅडव्होकेट अंजली अगरवाल आणि ग्रामीण उद्योजिका अजयता शहा यांचा यामध्ये समावेश होता. ङअडथळ्यांचा विचार न करता स्वप्नांचा पाठलाग करा. तुमची ध्येयासक्ती तुम्हाला यशस्वी करेल,फ असा संदेश मी तरुणींना देऊ इच्छिते, असे आर. वैशाली यांनी एक्सवर लिहिले. तर, ङअणू संशोधन व अंतराळ तंत्रज्ञानक्षेत्रात अधिकाधिक तरुणींनी कारकीर्द करावी,फ असे आवाहन एलिना मिश्रा व शिल्पी सोनी यांनी केले. ङविविध योजना व उपक्रमांच्या माध्यमातून आमचे सरकार महिला सक्षमीकरणासाठी कटिबद्ध असून नारीशक्तिला माझा प्रणाम!फ, असा संदेश पंतप्रधानांनी या महिलांना ङएक्सफचा ताबा देण्यापूर्वी दिला.

# जीएसटीचे दर आणखी कमी होतील!

## निर्मला सीतारमण यांनी दिले स्पष्ट संकेत...

**नवी दिल्ली:** अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) दरांमध्ये बदल करण्याचे संकेत दिले आहेत. अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी सांगितले की, जीएसटी स्लॅबमध्येही बदल करण्याचा विचार केला जात आहे. यासंदर्भात अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल. इकॉनॉमिक टाईम्सशी केलेल्या विशेष संभाषणात केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, जीएसटी दर तर्कसंगत करण्याबाबत अंतिम निर्णय लवकरच घेतला जाईल. स्लॅबची पुनर्रचनेसंबंधी विचार करण्यात येत आहे. गेल्या काही कालावधीपासून जीएसटी दर कमी होणार अशी चर्चा आहे. या विषयावर अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी लक्ष वेधले आहे. इकॉनॉमिक टाईम्सशी केलेल्या विशेष संभाषणात त्यांनी सांगितले की, जीएसटी दरांच्या तर्कसंगतीकरणाचा अंतिम निर्णय मंजूर झाला आहे. जीएसटीचे स्लॅब




पुन्हा तयार करण्यासाठी आढावा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. यामुळे लवकरच देशाला एक नवीन दिशा मिळेल आणि आर्थिक व्यवस्था सुधारेल.अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी स्पष्ट संकेत दिले आहेत की लवकरच जीएसटी प्रणालीत मोठे बदल होणार आहेत. जीएसटी दर कमी करण्याची आणि कर स्लॅब सोपे करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आहे. इकॉनॉमिक टाईम्सशी केलेल्या विशेष संभाषणात त्यांनी सांगितले की, सरकार लवकरच जीएसटी दर आणि स्लॅबमध्ये कपात करण्याचा निर्णय घेईल. अर्थमंत्र्यांनी असेही सांगितले की, त्या स्वतः प्रत्येक जीएसटी ग्रुपच्या कामाचा आढावा घेत आहेत जेणेकरून हे बदल देशाच्या हिताचे असतील. निर्मला सीतारमण म्हणाल्या की, जीएसटीमुळे कर संकलनात स्थिरता आली आहे. जीएसटीनंतर कोणत्याही वस्तूवरील कर वाढलेला नाही, असा दावाही त्यांनी केला. जीएसटीचे दर आणखी कमी होतील. जीएसटी प्रणाली अधिक सोपी करणे, कर दर कमी करणे आणि करदात्यांना दिलासा देणे हे सरकारचे उद्दिष्ट आहे.जीएसटी दर आणि टॅक्स स्लॅब आता कोणत्या उत्पादनावर कमी होतील हे लवकरच होणाऱ्या सरकारच्या निर्णयामध्ये कळेल.

# हवामान खात्याकडून मोठा इशारा, तीन दिवस उष्णतेची लाट...

मुंबई : गेल्या काही दिवसांपासून हवामानात सतत बदल होताना दिसत आहे. फेब्रुवारीच्या अखेरच्या आठवड्यात उष्णतेच्या लाटेमुळे मुंबईकर हैराण झाले असताना रविवारपासून



मुंबईसह ठाणे, रायगड, रत्नागिरी या जिल्ह्यांमध्ये पुन्हा उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आला आहे. अवघ्या १५ दिवसांत दुसऱ्यांदा उष्णतेच्या लाटेची स्थिती निर्माण झाल्याने आरोग्याच्या दृष्टीने अधिक सतर्कता बाळगण्याचे आवाहन हवामान विभागाने केले आहे. मार्च हा ऋतुबदलाचा महिना असल्याने या काळात उष्णतेच्या लाटांचा सामना करावा लागणे हा सामान्य अनुभव असल्याचेही हवामान विभागाने म्हटले आहे. मुंबईमध्ये वर्षभरात सरासरी ३१ दिवस उष्णतेच्या लाटांची स्थिती निर्माण होते. यामध्ये फेब्रुवारी, मार्चपासून ऑक्टोबर महिन्यांमध्येही निर्माण होणाऱ्या उष्णतेच्या लाटांचा समावेश होतो. फेब्रुवारी महिन्यामध्ये वाऱ्यांची दिशा बदलते. महाराष्ट्रावर निर्माण झालेल्या वातावरणीय दाबामुळे दिवसाच्या तापमानामध्ये वाढ होत आहे. तापमान कमी असताना आर्द्रता जास्त असते तेव्हा आपली अस्वस्थता वाढते. त्यावेळी केवळ उष्मा आणि आर्द्रतेमुळे त्रास होईल असा इशारा देण्यात येतो. मात्र, सध्या तापमानात वाढ होत असल्याने पुन्हा उष्णतेच्या लाटेचा इशारा देण्यात आल्याची माहिती प्रादेशिक हवामान विभागाचे प्रमुख सुनील कांबळे यांनी दिली.यासाठी दुपारच्या वेळेत बाहेर न जाणे, पाणी पिणे अशी काळजी घेणे आवश्यक आहे. रविवार, सोमवार आणि मंगळवार या तिन्ही दिवशी मुंबईचे कमाल तापमान ३७ ते ३८ अंशांदरम्यान असण्याचा अंदाज प्रादेशिक हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# कल्याणमध्ये भीषण अपघात, रेडी मिक्सरचा ब्रेक झाला निकामी, ९ वाहनांचा चक्काचूर अन्

**कल्याण-** कल्याण पूर्वेकडे पूना लिंक रोडला भीषण अपघात घडला. सिमेंटचा गिलावा वाहून नेणाऱ्या दोन रेडी मिक्सरनी नऊ वाहनांना धडक देऊन चिरडले. तथापी या अपघातात तीन जण जखमी झाले असून एकाची प्रकृती चिंताजनक झाली आहे. सुदैवाने या अपघातात जीवित हानी झाली नाही. कल्याण पूर्वेतील पुना लिंक रोडला असलेला विजयनगर हा वर्दळीचा परिसर मानला जातो. या रस्त्यावर भीषण अपघाताची घटना घडली. अपघात होत असताना या रस्त्यावर गर्दी कमी होती. अन्यथा मोठी जीवित हानी झाली असती, असे या भागातील व्यापाऱ्यांसह प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. प्रत्यक्षदर्शींनी या अपघाताबद्दल दिलेली माहिती अशी, की विजयनगरमधील कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या ड प्रभाग कार्यालयासमोरून दोन रेडी मिक्सर वाहने पाठोपाठ उतारावरून चक्कीनाक्याकडे जात होती. उतारावर असताना एका रेडी मिक्सरचा ब्रेक निकामी झाला. मागून चाललेल्या रेडी मिक्सरच्या चालकाला समोरील रेडी मिक्सरचा ब्रेक निकामी झाल्याचे समजताच, चालकाने पुढच्या मिक्सरला रोखण्यासाठी आपला मिक्सर पुढे नेण्याचा प्रयत्न केला. मात्र या गडबडीत ब्रेक निकामी झालेला रेडी मिक्सर



समोरच्या टेम्पोवर जाऊन धडकला. त्यामुळे टेम्पो बाजुच्या झाडासह दुकानांच्या समोर धडकला.टेम्पोला धडक बसल्याने टेम्पो चालकाचा वाहनावरील ताबा सुटला आणि टेम्पोची धडक रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या दुचाक्यांसह रिक्षांना बसली. बेसावध टेम्पो चालक झाड आणि दुकानांना धडकल्याने टेम्पोमधील व्यक्ति चालकाच्या केबीनमध्ये चिरडला गेला. त्याला बाहेर काढण्यासाठी स्थानिक रहिवाशांसह पोलिसांनी शर्थीचे प्रयत्न केले. अखेर त्याला केबीनमधून बाहेर काढून रुग्णालयाकडे हलविले. तर ब्रेक निकामी झालेल्या रेडी मिक्सरला वाचविण्यासाठी पुढे आलेला रेडी मिक्सर डिव्हायडरवर धडकला. या विचित्र अपघातामुळे विजयनगर परिसरातील वाहतूक काही काळ विस्कळीत झाली.वाहतूक नियंत्रण शाखेच्या पोलिसांनी तातडीने हालचाली करून क्रेन बोलावून अपघातग्रस्त वाहने मुख्य वर्दळीच्या रस्त्यावरून बाजुला केली. रेडी मिक्सरच्या धडकेत चिरडलेली वाहने रस्त्यावरून क्रेनच्या साह्याने बाजुला घेऊन रस्ता वाहतुकीसाठी मोकळा करण्यात आला. ही वाहने बाजुला घेत असताना पुन्हा या भागात वाहतूक कोंडी झाली होती. या अपघाताची कोळसेवाडी पोलिसांनी चौकशी सुरू केली आहे. हा अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला हे दोन्ही रेडी मिक्सर वाहन चालक/मालकांच्या चौकशीतून स्पष्ट होणार आहे. त्यानुसार गुन्हा नोंदविण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे पोलिसांनी सांगितले. नुकसान झालेल्या वाहनांच्या चालकांनी भरपाईसाठी हालचाली सुरू केल्या आहेत.

# बीड हादरलं! महिला दिनाला गालबोट, पोलिसाकडून महिलेला बोलावून घेत अत्याचार




**बीड :** पाटोदा पोलीस ठाण्याचे बीट अमलदार उद्धव गडकर यांनी महिला दिनानिमित्त कार्यक्रमासाठी एका महिलेला बोलावून पाटोदा येथील स्टेट बँकेच्या बाजूला असलेल्या घरात घेऊन त्या महिलेवर बलात्कार केल्याची घटना पाटोद्यात घडल्याने खळबळ उडाली असून पाटोदा शहरात ह्या घटनेची जोरदार चर्चा होत आहे.पोलिसच अशा घटना करायला लागले तर सर्वसामान्यांनी विश्वास कुणावर ठेवायचा रक्षकच भक्षक झाल्याचे चर्चा सध्या पाटोद्यात सुरू आहे. घडलेल्या घटने संदर्भात पाटोद्यात संतप्त प्रतिक्रीया उमटत आहे. यासंदर्भात पाटोदा पोलिसांकडून प्राप्त माहिती अशी कीगेवराई तालुक्यातील महिला मागील काही प्रकरणात पाटोदा पोलीस ठाण्यात ये-जा करीत असल्याने पाटोदा पोलीस ठाण्यातील बीट अमलदार उद्धव गडकर कर्मचाऱ्याच्या संपर्कात आली होती. यानिमित्ताने मोबाईल क्रमांकांची देवाणघेवाण झाली यातून त्यांच्यात संभाषण आणि मेसेज आदी होती यांच संधीचा लाभ घेत त्या कर्मचाऱ्याने महिला दिनाचे निमित्त सांगून त्या महिलेला पाटोदा येथे बोलावून घेतले होते ती महिला पाटोद्यात आली असता स्टेट बँक च्या बाजूला घेऊन जात महिलेवर बलात्कार केला. यावेळी त्या महिलेने आरडाओरड करण्याचा प्रयत्न केला मात्र तिला चोरीचा खोटा गुन्हा दाखल करण्याची धमकी देत बलात्कार केला. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास ती महिला तक्रार दाखल करण्यासाठी पाटोदा पोलीस ठाण्यात येवून स्वतः पोलीस निरीक्षक यांच्या समोर सांगितले आहे.दुपारी १ वाजल्यापासून ती महिला पोलीस ठाण्यातच बसून होती घटनेची गांभीर्य पाहून पोलीस उपअधीक्षक बाळकृष्ण हनुगडे पाटील यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात भेट देत व तपासा संदर्भात सुचना केल्या संध्याकाळी ६-३० सुमारास त्या महिलेला वैद्यकीय तपासणीसाठी बीड येथे पाठविण्यात आले आहे. त्या पोलीस कर्मचाऱ्या विरोधात गुन्हा क्र ७७/२५ भा.द.वी ६४/२-(१) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पाटोदा पोलीस निरीक्षक जाधव साहेब करीत आहेत. या घटनेची सर्वत्र चर्चा होत असून रक्षकच भक्षक झाल्याचं बोललं जात आहे.

# भारताचा इतका राग? ज्या संघाने काटा काढला आता त्याच संघाला पाठिंबा; डेव्हिड मिलरचे खळबळजनक विधान...

**लाहोर:** आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये न्यूझीलंडने दक्षिण आफ्रिकेला हरवून अंतिम फेरीत स्थान मिळवले. आफ्रिकन संघाच्या सामन्यात स्फोटक फलंदाज डेव्हिड मिलरने नाबाद १०० धावा केल्या. आता ९ मार्च रोजी अंतिम फेरीत न्यूझीलंडचा सामना भारताशी होईल. हा सामना दुबई आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर खेळला जाईल. टीम इंडियाने येथे त्यांचे सर्व सामने खेळले आहेत. न्यूझीलंडविरुद्धच्या पराभवानंतर मिलरने एक धक्कादायक विधान केले. त्याने चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडला पाठिंबा देण्याची घोषणा केली.

९ मार्च रोजी तो त्याच संघाला पाठिंबा देईल ज्या संघाविरुद्ध तो उपांत्य फेरीत पराभूत झाला होता. अंतिम सामन्याबद्दल विचारले असता




तो म्हणाला, ङ्मी तुमच्याशी प्रामाणिक राहीन. मला वाटते की मी न्यूझीलंडला पाठिंबा देईन. मिलरने भारतीय संघाचे कौतुकही केले आहे. तो म्हणाला, दोन्ही खूप चांगले संघ आहेत. भारताने जगाला दाखवून दिले आहे की त्यांचा संघ किती चांगला आहे. गेल्या अनेक वर्षांपासून ते सातत्याने चांगले क्रिकेट खेळत आहेत आणि त्यांच्याकडे काही खरोखर चांगले खेळाडू आहेत. हा एक उत्तम सामना असेल.मिलरने आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या वेळापत्रकावरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले आणि दुबईहून परतल्यानंतर लाहोरमध्ये दुसरा उपांत्य सामना खेळणे ही त्यांच्या संघासाठी आदर्श परिस्थिती नसल्याचे सांगितले. कराचीमध्ये गट टप्प्यातील शेवटचा सामना खेळल्यानंतर लगेचच, दक्षिण आफ्रिकेच्या संघाला दुसऱ्या दिवशी सकाळी दुबईला जाण्यासाठी विमान पकडावे लागले.

हायब्रिड मॉडेलवर खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेत, भारत आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या गट फेरीच्या सामन्याचा निकाल येईपर्यंत दक्षिण आफ्रिका आणि ऑस्ट्रेलियाच्या संघांना दुबईमध्ये तळ ठोकावा लागला. दक्षिण आफ्रिकेने ब गटात अव्वल स्थान पटकावले होते आणि भारत अ गटात अव्वल स्थान पटकावल्यामुळे त्यांना उपांत्य फेरी खेळण्यासाठी पाकिस्तानला परतावे लागले. या सामन्यात नाबाद शतक झळकावणारा मिलर म्हणाला, ठही एक तास ४० मिनिटांची उड्डाण असू शकते पण मला असे म्हणायचे आहे की आपल्याला हे करावेच लागले. सामना संपल्यानंतर लगेचच, आम्हाला दुसऱ्या दिवशी सकाळी लवकर विमान पकडावे लागले जेणेकरून आम्ही दुबईला वेळेवर पोहोचू शकू.

# दोन महिन्यांवर लेकीचं लग्न, पण हात पिवळे होण्याआधी घरावर कोसळला दु:खाचा डोंगर



**रायगड :** काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस आणि दुचाकीचा अपघात झाला. अपघातात वरसोली येथील मुलाचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना ताजी असताना महाड तालुक्यातील बिरवाडी काळीज येथे महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बस आणि मोटर सायकल यांच्यात समोरासमोर धडक लागल्याने राजेंद्र लक्ष्मण जाधव (वय ५७) राहणार खैरे, रायगड यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अपघाती मृत्यू झालेल्या राजेंद्र लक्ष्मण जाधव यांच्या मुलीचा विवाह मे महिन्यात आहे. लेकीचे हात पिवळे करण्याच्या अगोदरच वडिलांवर काळाने घाला घातला. यामुळे हळहळ व्यक्त केली जातंय. मुलीचे लग्न काही दिवसांवरच असताना वडिलांचा मृत्यू झालाय. याबाबत सविस्तर माहिती अशी आहे की, मयत राजेंद्र जाधव हे ८ मार्च २०२५ रोजी त्याची हिरो फॅशन मोटरसायकल एम. एच. ०६ बी वाय ९९७० ही घेऊन काळीज बाजूकडे जात असताना त्यांच्या गाडीला एसटीने धडक दिली आणि त्यांचा मृत्यू झाला.महाड एमआयडीसी पोलिस ठाणे येथे प्रविण जनार्दन जाधव यांनी एसटी बसचालक किरण श्रीमंत गायकवाड (वय ४१) रा.सरमकुंडी, धाराशीव याच्याविरोधात तक्रार दिली. सायंकाळी सव्वा सातच्या सुमारास काळीज गावचे हद्दीत एमएमए मैदानाचे समोर काळीज वाळण रोडवर समोरून महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या महाड आगारात कार्यरत असणारे बसचालक किरण श्रीमंत गायकवाड याने एसटी बस एम.एच २० बीएल ३७९९ ही काळीज बाजूकडून वारंगी बाजूकडे घेऊन जात राजेंद्र जाधव यांच्या मोटर सायकलीला धडक दिली.या अपघातात राजेंद्र जाधव हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना महाशक्ती रुग्णवाहिकेने तातडीने उपचारासाठी महाड येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. यानंतर याप्रकरणात गुन्हा दाखल करण्यात आला. सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने यांच्या मार्गदर्शाखाली पोलिस हवालदार व्हि.व्हि.पवार हे पुढील तपास करत आहेत. राजेंद्र लक्ष्मण जाधव हे खैरे गावचे पोलीस पाटील असून त्यांच्या मुलीचा विवाह मे २०२५ मध्ये आहे. मात्र, मुलीचा विवाह लावून तिला सासरी पाठविण्यापूर्वीच त्यांनी या जगाचा निरोप घेतला असल्याने जाधव कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळले आहे.

# सरकारी खात्यांना भ्रष्टाचाराने वेढले, नागपुरात बनावट निविदा प्रकरण उघड

**नागपूर :** नागपुरात सरकारी खात्याच्या नावाने फसवणुकीचे मोठे प्रकरण उघडकीस आले आहे. समाजकल्याण विभागाच्या नावाने बनावट निविदा काढून २० निवासी घरांच्या साफसफाईचे कंत्राट दिल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणाचा मुख्य सूत्रधार श्रीकांत डोईफोडे याच्याविरुद्ध सदर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तीन दिवसांपूर्वी श्रीकांत डोईफोडे याने जिल्हा परिषदेच्या समाजकल्याण विभागाच्या नावाने बनावट जाहिरात प्रसिद्ध केली होती. जाहिरातीतील २० झोपडपट्ट्यांच्या साफसफाईचे कंत्राट देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. विशेष म्हणजे, या जाहिरातीसाठी समाजकल्याण विभागाचे बनावट लेटरहेड वापरण्यात आले होते. त्यामुळे अनेक कंपन्यांनी या कंत्राटाबाबत चौकशी केली होती. या फसवणुकीत एका कंपनीला कंत्राट देण्यात आले आणि २१ मार्चपासून काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या. मात्र, खातरजमा करण्यासाठी संबंधित कंपनीने समाजकल्याण विभागाशी संपर्क साधला. आणि लक्षात आले की, अशी कोणतीही निविदा प्रक्रिया झालेली नाही. त्यामुळे हे संपूर्ण फसवणूकीचे प्रकरण उघडकीस आले.संशयित आरोपी श्रीकांत डोईफोडे याने सरकारी विभागाच्या अधिकृत कागदपत्रांचा गैरवापर करत बनावट निविदा प्रसिद्ध केली होती. यामुळे अनेक व्यावसायिक आणि ठेकेदारांची फसवणूक होण्याची शक्यता होती. सदर पोलीस ठाण्यात त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत. या फसवणुकीमागे आणखी काही जणांचा सहभाग आहे का, याचा शोध घेण्यासाठी पोलीस तपास करत आहेत. तसेच, ही एकट्या श्रीकांत डोईफोडेची योजना होती की, यामागे मोठे नेटवर्क कार्यरत आहे, याबाबत तपास सुरू आहे. सध्या पोलिसांनी काही महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली असून आरोपीच्या अन्य गुन्ह्यांची चौकशी केली जात आहे.

# पुरस्कार सोहळ्यात माधुरीची स्पेशल एन्ट्री, पण साडीचीच चर्चा जास्त



मुंबई: सिनेइंडस्ट्रीत सध्या पुरस्कार सोहळ्यांचे वारे आहेत. अनेक वाहिन्यांवर खास मालिकेतील कलाकारांसाठी त्यांच्या कामाचं कौतुक करण्यासाठी खास पुरस्कार सोहळे आयोजित केले जात असतात. स्टार प्रवाह वाहिनीचाही स्टार प्रवाह पुरस्कार सोहळा नुकताच मुंबईत पार पडला. वेगवेगळ्या मालिकेतील कलाकार, तंत्रज्ञ यांचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. पण या सगळ्यात एक खास सरप्राइज उपस्थितांना मिळालं ते म्हणजे धकधक गर्ल माधुरी दीक्षितची एन्ट्री. स्टार प्रवाह सोहळ्याच माधुरी दीक्षितची खास एन्ट्री झाली. तिची एन्ट्री ही सगळ्यांसाठी एक सुखद धक्काच होता. रॉयल-रेट्रो लुकमध्ये माधुरीनं या सोहळ्यात एन्ट्री केली. तिच्या लुकनं सगळ्यांचं लक्ष वेधून घेतलं. वेलवेटची गडद लाल रंगाची डिझायनर साडी, मोत्यांचा नेकलेस, रेट्रो लुकसाठी खास हेअर स्टाइल...असा तिला लुक नेहमी प्रमाणे सुंदर दिसत होता.या लुकमधले खास फोटो माधुरीनं तिच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरही शेअर केले आहेत. या फोटोंवर चाहते आणि नेटकऱ्यांकडून लाइक्स आणि कमेंट्सचा वर्षाव करण्यात आला असून, आता सोशल मीडियावर चर्चा सुरू झाली आहे ती, माधुरीच्या या वेलवेट साडीची आणि या साडीच्या किंमतीची.या वेलवेट साडीमध्ये माधुरीचं सौंदर्य आणखी खुलून आलं आहे. माधुरीनं नेसलेली साडी ही अर्थात महागडी अशीच आहे. ही साडी लोकप्रिय डिझायनर शामल आणि भूमिका यांच्या खास कलेक्शनमधली असून काही रिपोर्ट्सनुसार या साडीची किंमत १ लाख ८० हजार असल्याचं म्हटलं जात आहे. शामल आणि भूमिका यांच्या वेब साइटवर या साडीबद्दल माहिती दिली असली तरी त्यांनी किंमत मात्र सांगितली नाहीये. पण साडीची किंमत दोन लाखांच्या जवळपास असल्याचं सोशल मीडियावर म्हटलं जात आहे. त्यामुळं माधुरीच्या एका साडीच्या किंमत एक फॉरेन ट्रीप तर नक्कीच होईल. तर गेल्या वर्षी माधुरीनं आणखी एका मराठी पुरस्कार सोहळ्याला हजेरी लावली होती. या सोहळ्यात तिनं निळ्या-हिरव्या अशा फिरत्या रंगाची पैठणी नेसली होती. तिची ही साडी चांगलीच लोकप्रिय झाली होती.

# ज्या दिवशी शो बंद होईल, त्यादिवशी मीसुद्धा बंद होईन

## अमिताभ बच्चन यांचं काळजात धस्स करणारं वक्तव्य चर्चेत...



**मुंबई** - अमिताभ बच्चन हे बॉलिवूडचे मेगास्टार असून ते वयाच्या ८२व्या वर्षीही इंडस्ट्रीमध्ये सक्रीय आहेत आणि काम करत आहेत. अमिताभ बच्चन यांनी अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे. अमिताभ सध्या केबीसी १६ व्या सीझनचं सूत्रसंचालन करत आहेत. आता अमिताभ यांनी कौन बनेगा करोडपती १६ च्या मंचावर केलेलं वक्तव्य चर्चेत आलं आहे.अमिताभ बच्चन यांनी कौन बनेगा करोडपतीच्या स्टुडिओमध्ये उपस्थित असलेल्या प्रेक्षकांकडे पाहिलं आणि म्हणाले की, तुम्हीच आहात ज्यामुळे मला ऊर्जा मिळते. अमिताभ यांनी हे वाक्य उच्चारतात सर्वत्र टाळ्यांचा कडकडाट झाला. पुढे अमिताभ बच्चन भावुक होऊन म्हणाले की, ज्या दिवशी हा शो बंद होईल त्याच दिवशी मी सुद्धा बंद होईन अमिताभ बच्चन यांचं वक्तव्य ऐकून सगळेच थक्क झाले आणि त्यांना असं न बोलण्याची विनंती केली. पुढे अमिताभ बच्चन म्हणाले की, मी अत्यंत योग्य बोलतोय. शेवटी मी एक कलाकार आहे आणि त्यामुळे माझ्यातल्या कलाकाराला अशाच गोष्टी जिवंत ठेवतात. तुम्ही मोठ्या पडद्यावर मला बघता. मी जे काही करेल ते तुम्हाला प्रचंड आवडतं. तुम्ही त्या गोष्टींचं कौतुक करता. जोरजोरात टाळ्या वाजवता. तुमच्या टाळ्या हेच माझ्यासाठी जेवणासारखं आहे. काही दिवसांपूर्वी अमिताभ बच्चन यांनी जाण्याची वेळ आली आहे असंही ट्विट केलं होतं. ज्यामुळे सर्वत्र गोंधळ उडाला होता आणि चाहते चिंतेत होते.दरम्यान, अमिताभ बच्चन यांच्या वर्क फ्रंटबद्दल बोलायचं तर, अमिताभ बच्चन सध्या कौन बनेगा करोडपती १६ होस्ट करत आहेत. ते २०२४ मध्ये रजनीकांत स्टारर वेट्टियां चित्रपटात दिसले होते. सध्या त्यांनी कोणत्याही नवीन चित्रपटाची घोषणा केलेली नाही, परंतु असं म्हटलं जात आहे की, ते नितेश तिवारीच्या रामायण मध्ये दिसणार आहेत. त्याचबरोबर अमिताभ बच्चन हे बॉलिवूडचे मेगास्टार असून त्यांनी शोले, सिलसिला, डॉन, दिवार, मर्द यांसारख्या अनेक गाजलेल्या सिनेमांमध्ये काम केलं आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# पुण्यातील स्वारगेट बस स्थानकातून आणखी एक धक्कादायक प्रकार समोर...

**पुणे :** पुण्यातील स्वारगेट, शिवाजीनगर आणि पुणे स्टेशन येथील एसटी स्थानकांसह जिल्ह्यातील बहुतांश एसटी स्थानकांत सुरक्षा व्यवस्था खिळखिळी असल्याचे चित्र आहे. बलात्काराच्या घटनेनंतर स्वारगेट एसटी स्थानकात सुरक्षारक्षकांचा अहोरात्र पहारा लावलेला असताना आणि पोलिसांनी गस्त वाढवलेली असतानाही शनिवारी (आठ मार्च) पहाटे साडेपाच वाजता एका बसमधून प्रवाशाचा लॅपटॉप चोरीला गेला. या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल झाला आहे. बलात्काराच्या प्रकरसीनंतर स्वारगेट एसटी स्थानकात सुरक्षारक्षकांचा खडा पहारा नेमण्यात आला असून, पोलिसांनी गस्तही वाढली आहे. यामुळे उपद्रवी प्रवृत्तीच्या लोकांसह चोरट्यांना चाप बसेल, अशी अपेक्षा होती. मात्र, शनिवारी पहाटे साडेपाचच्या सुमारास बसमध्ये झालेल्या चोरीच्या घटनेने सर्व अपेक्षा फोल ठरल्या.वाकड येथे राहणाऱ्या केतन मोरे या तरुणाने स्वारगेट पोलिस ठाण्यात तक्रार दिली आहे. मोरे हे सेनापटी बापट रस्त्यावरील एका कंपनीत नोकरी करतात. कंपनीने त्यांना कामासाठी लॅपटॉप दिला होता. शनिवारी पहाटे रायगड जिल्ह्यातील महाड या मूळ गावी जाण्यासाठी ते पत्नी आणि मुलासह वाकड येथून पहाटे साडेपाच




वाजता स्वारगेट एसटी स्थानकावर आले. महाडच्या बसचे तिकिट काढून ते कुटुंबीयांसह बसमध्ये बसले होते. त्यांनी जवळचे सामान आणि लॅपटॉप बॅग एसटीमध्ये वरील बाजूच्या कॅरिअरवर ठेवली. काही मिनिटांत बस सुटण्यासाठी सज्ज झाल्यावर मोरे यांनी सामानाची पडताळणी केली; त्या वेळी लॅपटॉप बॅग गायब असल्याचे समजले. बसमध्ये सर्वत्र शोध घेऊनही बॅग न सापडल्याने त्यांनी स्वारगेट पोलिस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. उपनिरीक्षक बाळू शिरसाट या प्रकरणी तपास करीत आहेत.स्वारगेट एसटी स्थानकाच्या आवारात सुरक्षेच्या दृष्टीने पोलिसांचा सीआर मोबाइल पॉइंट आहे. या ठिकाणी दररोज पोलिसांची गाडी, कर्मचारी थांबलेले असतात. रात्रपाळीतील पथकाकडूनही गस्त घातली जाते. अशा कडेकोट पहाऱ्यातही चोरटे सक्रिय असल्याचे दिसत आहे. दत्तात्रय गाडे याने स्वारगेटमध्ये महिलेवर केलेल्या बलात्काराच्या घटनेनंतर तेथील बंदोबस्त वाढवण्यात आला आहे.

# मला धनंजय मुंडेंची कीव येते आणि रागही, - सुरेश धस

**मुंबई :** मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येनंतर मोठी खळबळ निर्माण झाली. संतोष देशमुख यांच्या हत्येवेळचे काही फोटो हे सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसले. हे फोटो पाहून कळाले की, संतोष देशमुखांची हत्या ही किती जास्त क्रूरपणे करण्यात आली. सीआयडी आणि एसआयटीकडून या प्रकरणातील तपास केला जातोय. सीआयडीने आपल्या आरोपपत्रात वाल्मिक कराडला नंबर एकचा आरोपी ठेवले. या प्रकरणातील एक आरोपी हा अजूनही फरार आहे. इतर सर्वजण कोठडीत आहेत. अनेक खुलासे याप्रकरणात होताना दिसत आहेत.सुरेश धस हे संतोष



देशमुख हत्या प्रकरणात आक्रमक भूमिका घेताना सुरूवातीपासूनच दिसले. संतोष देशमुख हत्या प्रकरण धनंजय मुंडे यांना इतके जास्त भोवले की, त्यांना आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा देखील द्यावा लागलाय. धनंजय मुंडे यांचे निकटवर्तीय वाल्मिक कराडचे नाव या प्रकरणात आल्यापासून सतत धनंजय मुंडेंना टार्गेट केले जात होते. त्यामध्ये हत्येच्या दरम्यानचे फोटो व्हायरल झाल्यानंतर राजीनाम्यासाठी दबाव वाढल्याचे बघायला मिळाले.शेवटी धनंजय मुंडेंनी आपला राजीनामा दिला. आमदार सुरेश धस हे एबीपी माझावर माझा कट्ट्यात बोलताना दिसले, यावेळी त्यांनी अनेक खुलासे केले. धनंजय मुंडे यांच्याबद्दल सुरेश धस यांना प्रश्न विचारण्यात आला. धनंजय मुंडे यांच्याकडे पाहून तुम्हाला काय वाटते?. यावर सुरेश धस म्हणाले की, मला धनंजय मुंडे यांनी किव येते....आणि रागही येतो.... त्यांच्याकडे बघून वाटते की, काय होतास तू...काय झालास तू....यावेळी सुरेश धस यांनी वाल्मिक कराड याच्याबद्दल खुलासा केला. सुरेश धस म्हणाले की, संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण फक्त धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यावरच थांबवले जाणार नाहीये. गोळीबाराच्या एका घटनेने वाल्मिक कराड हा मोठा झाल्याचे म्हणताना सुरेश धस दिसले. सध्या सुरेश धस हे सतीश भोसले याच्यामुळे अडचणीत आल्याचे बघायला मिळतंय. हेच नाही तर त्यांच्यावरही काही आरोप केले जात आहेत. सतीश भोसले याच्यावर गुन्हा दाखल झाला असून तो अजूनही फरार आहे.

# विधान परिषदेच्या जागेवर डोकेदुखी टाळण्यासाठी, अजितदादांची सेफ खेळी, हा शिलेदार असणार उमेदवार?

**अहिल्यानगर :** महायुती सरकारमध्ये बहुमताने सत्ता आली असली तरी मंत्रिपदावरून बरेच रुसवे फुगवे झाले. अद्यापही काही सुरू आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसमध्येही हे चित्र पहायला मिळाले होते. मंत्रीपद न मिळालेलेच नव्हे तर पद मिळूनही चांगले खाते न मिळाल्याने काही नेते नाराज झाले होते. आता विधान परिषदेच्या निवडणुकीत ही डोकेदुखी टाळण्यासाठी अजित पवार सेफ खेळी खेळण्याच्या तयारीत आहे. त्यासाठी ज्यांच्यावरून वाद उद्भवणार नाही,, अशा आणि संघटनेत काम केलेल्यांना संधी देण्याचा विचार पवार यांनी केला असला असल्याचे सांगण्यात येते. पवार यांच्या वाट्याला आलेल्या एका जागेसाठी मोठी स्पर्धा आहे. त्यात पक्ष संघटनेत पूर्वापासून सक्रीय असलेले शिर्डीतील संग्राम कोते पाटील यांचे नाव आघाडीवर असल्याचे सांगण्यात येते. आज दिवसभरात त्यावर शिक्कामोर्तब होऊन उद्या शेवटच्या दिवशी उमेदवारी अर्ज दाखल केला जाण्याची शक्यता आहे. पक्षीय बलाबल पहाता ही निवडणूक बिनविरोध होण्याचीच अधिक शक्यता आहे.विधान परिषदेच्या पाच जागांसाठी ही निवडणूक होत आहे. पाच पैकी तीन जागा भाजपच्या, तर एक एक जागा या राष्ट्रवादी अजित पवार गट आणि शिवसेना एकनाथ शिंदे गटाची आहे. पाचपैकी तीन जागांची मुदत पुढील वर्षी मे महिन्यापर्यंत आहे. तर बाकीच्या दोनपैकी एक जागा २०२३ पर्यंत तर दुसरी जागा २०२८ पर्यंत आहे. म्हणजेच यातील तिघांना वर्षभरापुरतीच आमदारकी मिळणार आहे.राष्ट्रवादीच्या वाट्याला एकच जागा येत असली तरी इच्छुकांची संख्या अधिक आहे. विधानसभा निवडणुकीतील यशामुळे अनेकांना याचे वेध लागले आहेत. तर या निवडणुकीत पराभव झालेली मंडळीही यासाठी इच्छुक आहेत. मात्र त्यांची संख्या अधिक आहे. त्यामुळे एकाला संधी दिली तर दुसरा नाराज, अशी स्थिती होऊ शकते. हे टाळण्याठी पवार वेगळा विचार करीत असल्याचे सांगण्यात येते. त्यातून शिर्डीचे संग्राम कोते पाटील, झिशान झिद्दीकी, आनंद परांजपे यांची नावे पुढे आली आहेत. जागा राष्ट्रवादीची असली तर त्यासाठी मतदान




तिन्ही पक्षांच्या आमदारांचे होणार आहे. त्यामुळे त्यांना चालणारा उमेदवारच द्यावा लागणार आहे. अशा चर्चेनंतर कोतेपाटील यांचे नाव जवळपास नक्की झाल्याचे सांगण्यात येते. कोते पाटील यांनी राष्ट्रवादी काँगेस एकसंघ असताना विद्यार्थी संघटनेपासून पक्षात काम केले आहे. पक्षफुटीनंतर त्यांनी अजित पवारांनाच साथ दिली. अजितदादांचे विश्वासू म्हणून त्यांची ओळख आहे. शिर्डीत अलीकडेच झालेल्या पक्षाच्या अधिवेशनाची जबाबदारी त्यांच्यावरच सोपविण्यात आली होती.

# घिर्णी गावातील नागरिकांच्या सतर्कमुळे चोरीचा प्रयत्न फसला...

## गावातील तरुणांनी घेतला सुरक्षेतेचा प्रश्न हाती, रात्रभर जागून केली गावाची रक्षा

जनसंचलन/बुलढाणा

गेल्या अनेक दिवसापासून संपूर्ण जिल्ह्यामध्ये चोरीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे रोज कुठे ना कुठे चोरीची घटना पाहायला मिळते त्यामुळेच नागरिकांच्या सुरक्षेतेनेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे रविवारी रात्री दीड ते दोनच्या सुमारास चोरांनी घिर्णी गावामध्ये धाडसी चोरी करून सर्वांना आश्चर्याचा धक्का दिला होता त्यामध्ये चोरांनी जवळपास एक लाख २५ हजार चा मुद्देमाल लंपास करून नागरिकांच्या मालमत्तेला नुकसान पोचले होते त्यामुळेच गावातील नव तरुणांनी आपल्या घराची सुरक्षिता आपणच करावी आपल्या गावाचे सुरक्षितता आपणच करावी अशी धारणा मनी धरून गावातील तरुणांनी एक व्हाट्सअप ग्रुप बनवून सर्व तरुणांना एकाच वेळेस मेसेज जाईल व सर्व मित्रमंडळी सावध होतील आणि आपल्या परिसराची व वगावाची सुरक्षा आपणच करावी या उद्देशाने ही संकल्पना गावातील नवतरुणांनी नवयुवकांनी अंगीकारल्यामुळे सर्व स्तराकडून गावातील तरुणांचे कौतुक केल्या जात आहे. परंतु चोरांच्या टोळीमुळे मलकापूर,



शेगाव ,मोताळा, मेहकर, चिखली, व संपूर्ण बुलढाणा जिल्हा सध्या चोरीच्या घटनांचा केंद्रबिंदू झाला आहे अशी चर्चा सर्वत्र सुरू आहे रोजच्या चोरीच्या घटनांमुळे नागरिक भयभीत होऊन हतबल झालेले आहे.

# विधवांनी ठरविले सौंदर्य लेणे तर घालायचेच शपथही घेतली...

## विधवा परिषद सामाजिक बदलाची नांदी ठरेल- प्रा. डी एस लहाने

जनसंचलन/ बुलढाणा

जागतिक महिला दिन सर्वत्र साजरा करण्यात आला. याच दिवसाचे औचित्य साधून मानस फाउंडेशनने कृतीयुक्त पाऊल उचललले.प्रा. डी एस लहाने यांच्यासंकल्पनेत जिजाऊ बहुउद्देशीय संस्था चे अध्यक्ष संतोष रायपूरे यांच्या पुढाकारात मलकापूर येथे महिला परिषद घेतली. ही महिला परिषद आगळीवेगळी ठरली आहे. हजारो विधवा व एकल महिलांनी लावलेली उपस्थिती अनेकांच्या भुवया उंचावून गेली. परिषदेत एकल महिलांच्या प्रश्नांवर सखोल चर्चा करण्यात आली.विधवा महिलांनी स्वत:च्या उन्नतीसाठी जाचक रूढी बंधने झुगारून पुढे यावे,स्वयंस्फूर्तीने विधवा महिला परिषदेला हजेरी लावत आहे. त्यामुळे या विधवा परिषदा इतिहासामध्ये नोंद होतील अशाच आहे.ही सामाजिक बदलाची नांदी असल्याचे संकल्पक प्रा. डी एस लहाने म्हणाले. विधवांनी पतीच्या निधनानंतर सौंदर्य लेणे घालायचेच अशी दांडगी शपथ यावेळी घेतली. त्यामुळे मलकापुरातील विधवा परिषद सामाजिक बदलाची नांदी ठरली आहे. विधवा महिलांच्या जीवनात उजेड पेरण्यासाठी बुलढाण्यात प्राध्यापक डी एस लहाने यांनी प्रयत्न चालवले आहे. फूले दांपत्यानंतर विधवा महिलांना लहाने यांच्या रूपाने हक्काचा भाऊ मिळालाय. मलकापूर येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून त्यांनी राष्ट्रमाता जिजाऊ बहुद्देशीय संस्था हरसोडा यांच्या मदतीने महिला परिषद घेतली. भातृ मंडळ मलकापूर येथे आयोजित कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी समाजसेविका शीलाताई संबारे होत्या. तर संतोष रायपुरे, गटविकास अधिकारी वेदिका सरजाणे व तहसीलदार चव्हाण , विद्या तायडे यांच्यासह अनेकांची उपस्थिती लाभली. सर्वप्रथम महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. प्रास्ताविक व भूमिका प्रा. डी एस लहाने यांनी मांडली.ते म्हणाले,महिला भगिनींना तसेही दुय्यम स्थान मिळाले आहे. मात्र विधवा महिलांना अत्यंत टोकाची वागणूक दिली गेली. वर्षानुवर्ष हा अन्याय आपण त्यांच्यावर करत आलो आहो. त्यांना शुभ कार्यामध्ये सहभागी करून



घेण्यास टाळाटाळ केली जाते. अनेक अनिष्ट रूढी परंपरा याच्यामध्ये त्यांचे जीवन भरडले जाते.आर्थिक प्रश्न तर कायमच भेडसावत आले आहेत. हे प्रश्न सोडवणे विधवा महिलांच्या जीवनातील प्रथम क्रमांकाची बाब आहे. दुर्दैवाने याकडे हवे तसे लक्ष दिले गेले नाही. पतीच्या निधनानंतर विधवा महिलेला मुलांचा सांभाळ करून घर संसार चालवावा लागतो. यामध्ये फार मोठ्या प्रमाणात आर्थिक हेळसांड होते. याकडे शासनाचे लक्ष वेधण्याचा आम्ही प्रयत्न करणार आहोत. तसेच तरुण मुलांनी लग्नासाठी विधवांना त्यांच्या मुलांसह स्वीकारण्याचे आवाहन त्यांनी केले. ही काळाची गरज असल्याचे प्राध्यापक लहाने म्हणाले. संतोष रायपुरे, गटविकास अधिकारी वेदिका सर्जाने, तहसीलदार चव्हाण यांनीही प्रसंगी विचार व्यक्त केले.

# क्षुल्लक कारणावरून ग्राम कुंड मध्ये तिघा मायलेकांना काका पुतण्याची मारहाण...

जनसंचलन/मलकापूर

शहर पोलीस स्टेशन हद्दीतील ग्राम कुंड बु! येथे दि. ७ मार्च रोजी दुपारी अडीच वाजेच्या दरम्यान शुल्क कारणावरून गावातील काका पुतण्यांनी तिघा मायलेकांना जबर मारहाण केल्याची घटना घडली. याबाबत वैभव राजु तितरे वय २३ रा. कुंड बु! याने शहर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली असून फिर्यादीत नमूद केले आहे की दि. ७ मार्च रोजी दुपारी अडीच ते तीन वाजे दरम्यान गावातील लग्न समारंभामध्ये जेवण करीत असताना विष्णू नारायण कवळे याने येऊन माझ्याशी वाद घातला मात्र लग्न दुसऱ्याच्या घरचे असल्याने मी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला, परंतु तो माझ्यासोबत वाद घालतच होता तेव्हा तिथे माझी आई नामे आशा राजु तितरे यांनी सर्व पाहिले म्हणून माझी आई विष्णू कवळे यांच्या घरासमोर जाऊन त्याचा भाऊ हरी नारायण कवळे यास सदर भांडणाबाबत सांगत असताना तेथे विष्णू नारायण कवळे,किरण गोपाल कवळे, आदित्य गोपाल कवळे, हरी नारायण कवळे असे चार काका पुतणे आले व त्यांनी माझ्यासोबत वाद घालून आईला लोटपोट केली असे समजल्याने मी माझा भाऊ गौरव तितरे असे तेथे गेलो असता विष्णू नारायण कवळे, किरण गोपाल कवळे, यांनी माझ्यासोबत वाद घालून मला शिवगाळ केली माझा भाऊ गौरव हा भांडण सोडण्यासाठी



आला असता त्याला किरण कवळे, आदित्य कवळे यांनी खाली पडलेली वीट उचलून त्याला डोक्यात मारली उजव्या हातावर काठीने मारहाण करून जखमी केले मी समजून सांगण्याचा प्रयत्न केला असता हरी कवळे, विष्णू कवळे यांनी लाकडी काठीने डाव्या हाताचे पंजावर पाठीवर व उजव्या पायाच्या पंजावर मारहाण करून मला जखमी केले, भांडणाच्या झटापटीमध्ये माझ्या गळ्यातील चांदीचा गोफ पडून गहाळ झाला त्यानंतर मी व माझी आई, भाऊ उपजिल्हा रुग्णालय मलकापूर येथे उपचार करण्यासाठी गेलो तेथे डॉ.नी प्राथमिक उपचार करून पुढील उपचारार्थ जिल्हा सामान्य रुग्णालय बुलढाणा येथे पाठविले,या प्रकरणी शहर पोलिसांना दिलेल्या फिर्यादीवरून विष्णू नारायण कवळे,हरिनारायण कवळे, किरण गोपाल कवळे, आदित्य गोपाल कवळे या काका पुतण्यांवर कलम ११८ (१), ११५ (२),३५२,३(५) बिएनएस गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास शहर पोलीस करीत आहे.

# सैलानी यात्रेस प्रारंभ, ७०० पोलिसांचा बंदोबस्त...

जनसंचलन/पिंपळगाव सराई

बुलढाणा तालुक्यातील सैलानी बाबा यात्रेस सुरवात झाली आहे. राज्यातील महत्त्वाच्या यात्रांपैकी एक असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. यात्रेस सुमारे पाच लाख भाविक उपस्थित राहण्याची शक्यता असल्याने, एक डीवायएसपी, एक पीएसआय, ३५ महिला पोलिस, १५० पोलिस कर्मचारी, ३०० होमगार्डसह एकूण ७०० पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. यात्रेतील नारळाची होळी आणि सैलानी बाबांचा संदल ही मुख्य आकर्षणे आहेत. पोलिस अधीक्षक विश्व पानसरे, अपर पोलिस अधीक्षक बी. बी. महामुनी आणि एसडीपीओ सुधीर पाटील यांनी यात्रेतील विविध



सुरक्षा व्यवस्थांची पाहणी केली. गर्दीचा फायदा घेत चोरटे हात साफ करू शकतात, त्यामुळे भाविकांना मौल्यवान वस्तू न आणण्याचे आवाहन रायपूर पोलिस ठाण्याचे ठाणेदार दुर्गेश राजपूत यांनी केले आहे.

# क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर टाले एका वर्षासाठी ६ जिल्ह्यातून तडीपार...

## कारवाई अन्यायकारक; शेतकरी व कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड रोष

**जनसंचलन/बुलढाणा**

शेतकरी नेते रविकांत तुपकर यांचे अत्यंत विश्वासू आणि निकटवर्तीय सहकारी असलेले डॉ. ज्ञानेश्वर टाले यांच्यावर मेहकर उपविभागीय दंडाधिऱ्यांनी एका वर्षासाठी तडीपारीची कारवाई केली आहे.विशेष म्हणजे बुलडाणा जिल्ह्यालगतच्या सर्व जिल्ह्यातून डॉ टाले यांना तडीपार करण्यात आले आहे.रविकांत तुपकर यांच्या नेतृत्वात गेल्या तेरा वर्षापासून डॉ. ज्ञानेश्वर टाले शेतकरी चळवळीत काम करीत आहेत. क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे ते जिल्हाध्यक्ष आहेत. राजकीय आकसापोटी त्यांच्यावर ही कारवाई करण्यात आल्याचा आरोप शेतकरी करीत असून, झालेली कारवाई अन्यायकारक असल्याचा रष कार्यकर्ते व शेतकरी व्यक्त करीत आहेत.यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. डॉ. ज्ञानेश्वर टाले यांची वर्तणूक चांगली नाही, त्यांच्यावर विविध स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. आगामी काळातील सण-उत्सव आणि निवडणुका पाहता कोणत्याही प्रकारची अनुचित घटना घडून कायदा व सु व्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असे म्हणत कलम ५६ (१) (अ )(ब )मुंबई पोलीस कायदा १९५१ या कायद्याचा आधार घेत,मेहकरचे उपविभागीय दंडाधिकारी रवींद्र जोगी यांनी डॉ. ज्ञानेश्वर टाले यांना एका वर्षासाठी तडीपार करण्याचे आदेश पारित केले आहेत.बुलडाणा जिल्ह्यासह लगतच्या सर्व जिल्ह्यातुन तडीपार केले आहे.४ मार्च रोजी सदरचे आदेश पारित करण्यात आले. डॉ. ज्ञानेश्वर टाले हे एका सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील सदस्य आहेत. त्यांचे आई-वडील अल्पभूधारक शेतकरी आहेत तर डॉ. टाले गेल्या तेरा वर्षांपासून शेतकरी चळवळीत कार्यरत आहेत. रविकांत तुपकर यांचे ते अत्यंत विश्वासू आणि जवळचे सहकारी आहेत. तुपकर यांच्या नेतृत्वात डॉ. टाले यांनी शेतकऱ्यांसाठी अनेक आंदोलने केली आहेत. मेहकर मतदारसंघात क्रांतिकारी शेतकरी संघटनेची मजबूत बांधणी त्यांनी केली आहे. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा निवडणुकीत रविकांत तुपकर यांना अपक्ष असूनही मेहकर मतदार संघात महायुती व महाविकास आघाडीच्या उमेदवारांच्या बरोबरीत मते मिळाली यामध्ये डॉ. ज्ञानेश्वर टाले यांचे महत्त्वाचे योगदान ठरले हे विशेष..! डॉ. ज्ञानेश्वर टाले हे सराईत गुन्हेगार नाहीत, त्यांच्यावर दाखल असलेले बहुतांश गुन्हे शेतकरी आंदोलनातील आहेत. डॉ. टाले यांच्यावर एकूण सहा गुन्हे दाखल आहेत त्यातील चार गुन्हे हे शेतकरी आंदोलनातील आहेत. मलकापूर येथे रेल्वे रोको आंदोलन बुलढाण्यात रविकांत तुपकर यांचे अन्नत्याग आंदोलन व तुपकर यांच्या अटकेचा निषेध म्हणून दोन गावांमध्ये केलेले ठिय्या आंदोलन असे चार गुन्हे आंदोलनाचे आहेत तर दोन गुन्हे राजकीय वैमनस्यातून दाखल करण्यात आले असून ते देखील गंभीर स्वरूपाचे नाहीत, शिवाय हे सर्व प्रकरण न्यायप्रविष्ठ आहेत. असे असतानाही डॉ. टाले यांना सराईत गुन्हेगार ठरवून त्यांच्यावर एका वर्षाच्या तडीपारची कारवाई करण्यात आल्याने कार्यकर्ते आणि शेतकऱ्यांना धक्काच बसला आहे. राजकीय दबावापोटी अन्यायकारक कारवाई करण्यात आली आहे असा रोष मेहकर मतदारसंघातूनच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातून शेतकरी चळवळीतील कार्यकर्ते व शेतकरी व्यक्त करीत आहेत. दरम्यान महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ६० अन्वये माननीय विभागीय आयुक्त अमरावती यांच्याकडे सदर आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले आहे.

# मेहकर येथे स्वस्त औषध केंद्राचे केंद्रीय राज्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

**जनसंचलन/मेहकर**

केंद्र आणि राज्य शासनाच्या माध्यमातून नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी आणि त्यांना सर्व प्रकारची औषधी स्वस्त दरात उपलब्ध व्हावी, म्हणून मोठ्या प्रमाणात लोक कल्याण स्वस्त औषध केंद्रांची स्थापना करण्यात येत आहे. त्याचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन केंद्रीय आयुष आरोग्य, कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी केले. शनिवारी मेहकर येथे ग्रामीण रुग्णालय परिसरातील लोककल्याण स्वस्त औषध केंद्राचे उद्घाटन केंद्रीय राज्यमंत्री जाधव यांच्या हस्ते झाले. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. लोककल्याण स्वस्त औषधी केंद्रांमधून जवळपास ८० टक्क्यांनी स्वस्त औषधी रुग्णांना उपलब्ध होते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुदेश लोढे, सीएस डॉ. भागवत भुसारी, डॉ. वैभव लोढे, विवेक खराटे, संदीप लोढे, डॉ. सुनीता हिवसे आदी उपस्थित होते.

पत्रकारीतेचा धर्म
आम्ही निभावणार
सिटी न्यूज टीव्ही & सोशल चॅनल
वेब साईड & पोर्टल चॅनल
वृत्त पेपर हार्ड कॉपी सह - ई पेपर
कुठली ही बातमी निशुल्क
***
दैनिक निडर निर्भीड
जनसंचलन
काही तक्रार असल्यास संपर्क
शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स, कारंजा चौक बुलडाणा मो.9822720784,9373359040
पिन 443001







दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958